# विद्यार्थ्यांच्या लैंगिक शोषणाबाबत सजगता महत्त्वाची

खराब शैक्षणिक कामगिरी, मानसिक आणि शारीरिक अस्वास्थ, शोषणाची वाढती पायरी आणि आपल्या पालकांशी खराब नातेसंबंध आदी गोष्टी शोषणामुळे होतात. यामुळेच मुलांना योग्य ती माहिती देणे, त्यांचा दृष्टिकोन तयार करणे आणि मुलांच्या लैंगिक शोषणाच्या घटना रोखण्यासाठी कौशल्य प्राप्त करून देणे तसेच दुर्दैवाने अशी घटना घडलीच तर त्यांना पूर्णतया पाठिंबा देणे गरजेचे आहे. पालक, शिक्षक आणि शाळेचा कर्मचारी वर्ग यांच्यात मुलांच्या लैंगिक शोषणाबाबत जागरूकता करणे गरजेचे आहे.

## अर्पणच्या अहवालाचे प्रकाशन




**प्रतिनिधी**
feature@prahaar.co.in


अर्पण ही मुलांच्या लैंगिक शोषणाविरोधात काम करणारी आघाडीची एनजीओ आहे. इंटिग्रेशन ऑफ पर्सनल सेफ्टी एज्युकेशन प्रोग्रॅम इन स्कुल्स : अ केस स्टडी या केस स्टडीचे प्रकाशन नुकतेच अर्पणच्या वतीने करण्यात आले.

आजच्या घडीला आपल्या देशातील अर्ध्याअधिक मुलांना (चाइल्ट सेक्शुअल ॲब्युस रिपोर्ट २००७) लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागत आहे. एकूण बलात्कारित पीडितांपैकी ५४.५ टक्के मुलं ही १८ वर्षांखालील (एनसीआरबीआय २०१५) असतात. महाराष्ट्रात अशा गुन्ह्यांच्या जास्तीत जास्त केस मुलांच्या बाबतच दाखल करण्यात आल्या आहेत, अशा प्रकारच्या एकूण केसपैकी १४.८ टक्के केस (एनसीआरबीआय २०१५) त्यांच्याच आहेत. मुलांच्या लैंगिक शोषणाच्या जास्तीत जास्त केस दाखल होत आहेत, आजच्या घडीलाही परिस्थिती अजिबात बदललेली नाही, हे आम्हाला माहिती आहे. मुलांचे लैंगिक शोषणामुळे नातेसंबंधांमधील तणाव, आत्महत्येकडे पाऊल, पोस्ट ट्रॅमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर आणि इतर मानसिक परिणाम असे दुष्परिणाम होऊ शकतात. यामुळे खराब शैक्षणिक कामगिरी, मानसिक आणि शारीरिक अस्वास्थ, शोषणाची वाढती पायरी आणि आपल्या पालकांशी खराब नातेसंबंध आदी गोष्टीही शोषणामुळे होतात. यामुळेच मुलांना योग्य ती माहिती देणे, त्यांचा दृष्टिकोन तयार करणे आणि मुलांच्या लैंगिक शोषणाच्या घटना रोखण्यासाठी कौशल्य प्राप्त करून देणे तसेच दुर्दैवाने अशी घटना घडलीच तर त्यांना पूर्णतया पाठिंबा देणे गरजेचे आहे. पालक, शिक्षक आणि शाळेचा कर्मचारी वर्ग यांच्यात मुलांच्या लैंगिक शोषणाबाबत जागरूकता करणे गरजेचे आहे, यामुळे मुलांच्या सुरक्षिततेत ते मोठी भूमिका पार पाडू शकतील आणि त्यांना शोषणाची कुठलीही घटना घडू नये, यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणे शक्य होईल.

इंटिग्रेशन ऑफ पर्सनल सेफ्टी एज्युकेशन प्रोग्रॅम इन स्कुल्स : अ केस स्टडी या संशोधन अहवालात शाळेच्या बीसीजी ग्रुपमध्ये वैयक्तिक सुरक्षा शिक्षण उपक्रमाच्या परिणामांचे गुणांकन करण्यात आले. हे गुणांकन बॉम्बे केंब्रिज गुरुकुल (बीसीजी)च्या पाच शाळांमध्ये घेण्यात आले. शाळेतील इयत्ता पाचवी, सहावी आणि सातवीच्या १५२ विद्यार्थ्यांसाठी फोकस्ड ग्रुप डिस्कशन्स (एफजीडी) आयोजित करण्यात आले होते. १५२ विद्यार्थ्यांशिवाय ३१ मुलांच्या वैयक्तिक मुलाखती घेण्यात आल्या. ५ प्रमुख शिक्षक आणि प्राचार्य, १० शिक्षक (ज्यांनी वैयक्तिक सुरक्षा शिक्षण उपक्रमाचे आयोजन केले होते), ५ समुपदेशक, ९ पालक, सीईओ आणि विभागप्रमुखांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

### अभ्यासातील ठळक गोष्टी

- असुरक्षित परिस्थिती ओढवल्यास मुलांनी अधिकाधिक प्रमाणात मदत शोधावी याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. ठाम नकार देण्याचे कौशल्य आणि तातडीने आपल्या विश्वासार्ह पालकांकडे याची तक्रार करणे या गोष्टी मुलांनी करायला हव्यात. भूतकाळात ज्यांना अशा असुरक्षित परिस्थितीला तोंड द्यावे लागले आहे, अशा सर्व ९ विद्यार्थ्यांना त्यांच्या विश्वासार्ह पालकांकडून मदत मिळाली होती आणि या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा तातडीचा मार्गही सापडला होता.
- सर्व ग्रुपमधील मुले त्यांच्या शरीराबाबत कम्फर्टेबल असतात, त्यांना माहिती असते, त्यांचे शरीर हे त्यांचे स्वतःचे आहे आणि स्वतःच्या सुरक्षेच्या खात्रीसाठीही त्यांनाच सक्रिय राहायचे आहे. आपल्या शरीराच्या गुप्त भागांची नावे घेणे आणि वैयक्तिक सुरक्षेचे नियम / मार्गदर्शक तत्त्वे लक्षात ठेवणे याबाबतही ही मुले कम्फर्टेबल होती.
- वैयक्तिक सुरक्षा शिक्षण उपक्रम पालकांना योग्य वयासाठी, गरजेचा आणि पुरेसा वाटला. पालक या उपक्रमातील संहिता आणि एकूण माहितीसाठी कम्फर्टेबल होते.
- शिक्षकांना मुलांच्या लैंगिक शोषणाची चिन्हे आणि लक्षणे याबाबत माहिती असल्याचे दिसून आले आणि मुलांच्या माहितीबाबत करण्याबाबत ते सक्रिय प्रतिक्रिया देत होते.
- शिक्षकांना वैयक्तिक सुरक्षा शिक्षण उपक्रम म्हणजे सुयोग्य वयासाठीचे मॉडेल वाटले. मुलांच्या लैंगिक शोषणामुळे निर्माण होणारे त्रास हाताळता येण्याच्या मुख्य प्रक्रियेला मदत करता येणार आहे.

### अभ्यासक्रमात कौशल्य प्रशिक्षणाचा समावेश व्हावा

“अर्पणने नेहमीच वैयक्तिक सुरक्षा शिक्षण उपक्रमात खऱ्या अर्थानें कार्य केले आहे. अनेक वर्षांपासून आम्ही शाळांमध्ये वैयक्तिक सुरक्षा शिक्षण उपक्रम घेत आहेत आणि त्यासाठी गुंतवणूक करत आहोत, यामुळे मुलांना आवश्यक कौशल्यांची माहिती मिळून त्यांचे सबलीकरण होण्याबरोबरच. लैंगिक शोषणाच्या घटनांना प्रतिकार करण्याचा दृष्टीकोनही तयार होणार आहे, याशिवाय अशा घटनांमध्ये आपल्याला मदत करू शकतील अशा शिक्षक, पालक यांना तातडीने माहिती पुरवण्याकडे त्यांचे मनोबल वाढत आहे. आपल्या अत्यंत महत्त्वाच्या आयुष्यासाठी शालेय स्तरावर अभ्यासक्रमात कौशल्य प्रशिक्षणाचा समावेश झाला तर मुलांच्या लैंगिक शोषणाला आळा बसणे शक्य आहे, यावर आपला विश्वास हवा आणि यासाठी शाळांनी प्रत्येक मुलाला हे शिकवण्याची जबाबदारी घ्यायला हवी.

**- पूजा तपारिया, संस्थापक आणि प्रमुख कार्यकारी अधिकारीअर्पण**

### अर्पणचा उपक्रप विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त

“अर्पण शालेय स्तरावर राबवत असलेल्या वैयक्तिक सुरक्षा शिक्षण उपक्रमाचा परिणाम पाहताना मला आनंद होत आहे. गेल्या आठ वर्षांपासून मी या प्रकल्पाला पाठिंबा देत आहे आणि मुलांच्या लैंगिक शोषणाचा मुद्दा लवकरात लवकर सोडवणे गरजेचे आहे, असे मला वाटते. मुले आपल्या देशाचे भविष्य असतात आणि त्यांच्यात गुंतवणूक म्हणजे आपल्या देशाच्या भविष्यासाठी गुंतवणूक करणे होय.

**- राकेश झुनझुनवाला, संस्थापक, रेअर एंटरप्राइजेस**